PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 11, ISSUE 04

# "सावित्रीबाई फुले यांच्या चरित्रात्मक कादंबऱ्यांतून कादंबरीकारांनी साकारलेली व्यक्तीरेखा : एक आकलन"

विनोद छगन पवार
संशोधन केंद्र मराठी विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे -४११००७
महाराष्ट्र भारत

**१. प्रस्तावना:**

प्रस्तुत शोधनिबंधात सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्रावर आधारित कादंबरी लेखनाचे विवेचन करावयाचे आहे. त्यासाठी हा लेखन आहे ते पुढील प्रमाणे सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर पुढील कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत त्यापैकी काही निवडक कादंबऱ्यांचे विवेचन येथे केले आहे कांबळे झुंबरलाल. 'सावित्रीबाई फुले', (१९९५) बनसोडे, हिं. गो. 'आभाळाएवढी'. (१९८१)पांढरे नीला, ज्योती-सावित्री (२००१) मुरूमकर कविता, 'मी सावित्री जोतीराव'(२०१०)'अनाथांची माय माऊली', हिराचंद्र ब्राह्मणे(२०१६) यासावित्रीबाईंच्या जीवनचरित्रावर आधारित कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. त्यादृष्टीने चरित्रलेखन या वाङ्मयप्रकाराची संकल्पना मांडणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने चरित्र आणि चरित्रात्मक कादंबरी यांचा अनुबंध समजून घेणे महत्त्वाचे आहे. चरित्र, कादंबरी आणि चरित्रात्मक कादंबरी यांची संकल्पना आणि गुणवैशिष्ट्ये संक्षिप्तपणे समजावून घेऊन सावित्रीबाई फुले विषयक कादंबऱ्यांची आशय व अभिव्यक्तीच्या दृष्टीने चिकित्सा करणे गरजेचे आहे.

**१. चरित्र व कादंबरी :**

चरित्र आणि कादंबरी हे दोन्हीही ललित वाङ्मयातील महत्त्वाचे प्रकार आहेत. यातील चरित्रातील चित्रण हे प्रत्यक्षाच्या पातळीवरून होते. चरित्रामध्ये प्रत्यक्षात जीवन जगलेल्या व्यक्तींचे चित्रण येते. तर कादंबरी हा वाङ्मय प्रकार काल्पनिक वास्तवाशी संबंधित असतो. तरीही चरित्र आणि कादंबरी या दोन्ही ललित वाङ्मय प्रकारामध्ये काही गुणविशेष समानही असतात. या दोन्ही वाङ्मय प्रकारात व्यक्तिजीवन हा कुतूहलाचा विषय असतो. कादंबरीत सर्वसामान्यपणे काल्पनिक व्यक्ती चित्रित होतात. कादंबरीतील व्यक्तिरेखा प्रत्यक्षातील व्यक्तीशी अगदी तंतोतंत जुळाव्यात अशी अपेक्षा करण्यापेक्षा त्यांचे प्रत्यक्षातील व्यक्तींशी अधिक साम्य असण्याची अपेक्षा करता येईल. कादंबरीकाराने प्रत्यक्षाची सत्याची चौकट झुगारून दिलेली असते आणि काल्पनिकतेला तो महत्त्व देतो. मुळात कादंबरीकाराच्या लेखनामध्ये, "चित्रित होणाऱ्या नायकाच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास आणि संविधानक यावर संपूर्ण नियंत्रण असते. कादंबरीकार जे काही सांगतो ते बरोबर असते पण ते सत्य असेलच असे नाही. कारण नवनिर्मिती, ही प्रत्येक कादंबरी लेखनामागील लेखकाची प्रेरणा असते. भारतात अनेक विभूती होऊन गेलेत त्यापैकी सावित्रीबाई फुले हे आहे एक आहेत

भारतीय समाजातील सामाजिक परिवर्तनाच्या प्रवाहात स्त्रीच्या शिक्षणाचा व सन्मानाचा प्रश्न केंद्रस्थानी आला, तेव्हा त्या परिवर्तनाचा पहिला प्रयत्न सावित्रीबाई फुले यांच्या जीवन कार्यातून दिसून येतो . सावित्रीबाई फुले या केवळ एक समाजसुधारक नव्हत्या, तर भारतीय स्त्रीशक्तीचे मूर्त प्रतीक होत्या. त्यांच्या चरित्रावर आधारित अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत जसे की झुंबरलाल कांबळे यांची 'सावित्रीबाई फुले', हि. गो. बनसोडे यांची 'आभाळाएवढी', नीला पांढरे यांची 'मी ज्योती सावित्री', कविता मुरूमकर यांची 'मी सावित्री ज्योतिराव', आणि हिराचंद्र ब्राह्मणे यांची 'अनाथांची माय माऊली'.या सर्व कादंबऱ्यांमधून साकारलेली सावित्रीबाईंची व्यक्तिरेखा बहुआयामी, संघर्षशील, करुणामयी व प्रेरणादायी स्वरूपात साकार केलेली आहे .

**२. व्यक्तिरेखेचे स्वरूप : संघर्ष आणि समर्पण यांचा संगम**

चरित्रात्मक कांदबऱ्यामधील सावित्रीबाईंची व्यक्तिरेखा ही एका संघर्षमय स्त्रीची आहे. त्यांनी बालवयात विवाह करून अत्यंत रूढीग्रस्त समाजात आपले स्थान निर्माण केले. शिक्षणासाठी त्यांनी केलेला संघर्ष,

समाजाकडून झालेल्या अपमानाचा सामना करण्याचे धैर्य आणि शिक्षण प्रसाराची तळमळ यांचे जिवंत चित्र अनेक लेखकांनी आपल्या शब्दांत रेखाटले आहे.झुंबरलाल कांबळे यांनी सावित्रीबाईंचे व्यक्तिमत्त्व "संघर्षातून साकारलेली क्रांतीज्योती" असे संबोधले आहे. त्यांच्या मते सावित्रीबाई या समाजाच्या अंधकारात मशाल घेऊन उभ्या राहिलेल्या स्त्री आहेत. त्या फक्त जोतीरावांच्या पत्नी नव्हत्या, तर त्यांच्या कार्याची समान भागीदार होत्या.

**३. शिक्षिका म्हणून सावित्रीबाईंचे रूप**

बहुतेक चरित्रात्मक कादंबऱ्यांमध्ये सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या शिक्षिका म्हणून विशेषत्वाने उभ्या राहतात.'आभाळाएवढी' या कादंबरीत बनसोडे यांनी शाळेतील पहिला दिवस, मुलींच्या पालकांचा विरोध, आणि समाजातील तिरस्कार यांचा तपशीलवार उल्लेख केला आहे. तरीही सावित्रीबाईंच्या व्यक्तीरेखेत असलेली शिक्षणाची ओढ, आणि ज्ञानाला 'मानवमुक्तीचा मार्ग' मानणारी त्यांची विचारसरणी वाचकांवर गारूड करते. त्या शाळा चालवत असतानाच समाजातील अस्पृश्य मुलांनाही शिक्षण दिले. यावरून त्यांचे व्यक्तिमत्त्व मानवी समानतेच्या मूल्यावर आधारित होते, हे स्पष्ट होते.

**४. करुणामयी आणि मातृत्वपूर्ण व्यक्तिमत्त्व**

सावित्रीबाईंच्या चरित्रातील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांचे मातृत्वभाव. 'अनाथांची माय माऊली' या हिराचंद्र ब्राह्मणे लिखित कादंबरीत त्या 'अनाथांची माय माऊली ' म्हणून ओळखल्या जातात. पुण्यात प्लेगच्या साथीत त्यांनी रुग्णांना आपल्या हाताने सांभाळले. मृतांना अग्नी देताना स्वतःच्या जीवाची पर्वा केली नाही. या प्रसंगांमधून उभे राहणारे सावित्रीबाईंचे चित्र म्हणजे "करुणा आणि सेवा यांचे साकार रूप". त्यांची ही करुणा केवळ स्त्रीत्वाची नव्हे तर मानवी सहृदयतेची उच्चतम पातळी दर्शवते.

**५. बौद्धिक आणि विचारवंत सावित्रीबाई**

अनेक चरित्रात्मक कादंबऱ्यांमध्ये सावित्रीबाईंच्या विचारशक्तीचा व बौद्धिक दृष्टिकोनाचा उल्लेख सापडतो.'मी सावित्री ज्योतिराव' कविता मुरूमकर लिखित चरित्रात्मक कादंबरी मध्ये त्या जोतीरावांसोबत सामाजिक सुधारणा, शिक्षणाची तत्त्वे, स्त्रीपुरुष समानता आणि धर्माचा प्रश्न यावर चिंतन करतात.त्यांची कविता "जागा उठा रे सावरा..." ही फक्त भावनात्मक साद नव्हे तर क्रांतिकारी आवाहन आहे. या रूपात त्या एका विचारवंत स्त्रीचे प्रतीक म्हणून उभ्या राहतात, ज्यांच्या कल्पना

आजच्या स्त्रीवादी विचारसरणीशी मिळत्याजुळत्या आहेत.

**६. सावित्रीबाईंची सामाजिक जाणीव आणि कार्यशीलता**

'ज्योती सावित्री' या नीला पांढरे लिखित कादंबरीत सावित्रीबाईंच्या कार्यशीलतेचा आविष्कार विशेष ठळक आहे. त्यांनी फुले दांपत्याने चालविलेल्या सत्यशोधक समाजाच्या कार्यात सहभाग घेतला, महिलांच्या शिक्षणासाठी लढा दिला, विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रचार केला, आणि अस्पृश्यतेविरुद्ध आवाज उठविला. या सर्व घटना प्रसंगांना कादंबरीकारांनी न्याय देण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

त्यांच्या व्यक्तिरेखेतील सामाजिक भान केवळ वैयक्तिक अनुभवावर आधारित नव्हते; तर समाजातील सर्वच घटकांना समानतेचा हक्क मिळावा, या व्यापक दृष्टीकोनातून त्यांनी कार्य केले. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्वात एक प्रकारची सामाजिक नेतृत्वाची गुणवत्ता दिसून येते.

**७. सावित्रीबाईंच्या व्यक्तिरेखेतील भावनिक आणि मानसिक संघर्ष**

प्रत्येक चरित्रात्मक कादंबरीकारानी सावित्रीबाईंच्या अंतर्मनातील संघर्षावर प्रकाश टाकलेला दिसून येतो.

'आभाळाएवढी' आणि 'सावित्रीबाई फुले' या कादंबऱ्यांमध्ये त्यांनी समाजाच्या अवहेलनांचा सामना करताना अनुभवलेली वेदना, अपमान आणि तिरस्काराचे क्षण फारच जिवंत रेखाटलेले आहेत. परंतु त्या क्षणांना त्यांनी दु:ख म्हणून नव्हे, तर नव्या लढ्याची प्रेरणा म्हणून स्वीकारले. त्यांची व्यक्तिरेखा आपल्याला शिकवते की खऱ्या क्रांतीसाठी बाह्य शक्तीपेक्षा अंतःशक्ती अधिक महत्वाची असते.

**८. कादंबरीकारांचे दृष्टिकोन**

प्रत्येक कादंबरीकाराने आपल्या हस्तसिद्ध लेखणीने सावित्रीबाईंच्या व्यक्तिरेखेचा अर्थ आपल्या दृष्टीने मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.

**हि. गो. बनसोडे : मानवतावादी आणि शिक्षिका म्हणून आदर्श.**

**नीला पांढरे : सामाजिक परिवर्तनाची प्रेरक शक्ती.**

**कविता मुरुमकर : विचारवंत, सहचारिणी आणि सृजनशील स्त्री.**

**हिराचंद्र ब्राह्मणे : करुणामयी, माऊली स्वरूपाची स्त्री.**

या सर्व कादंबऱ्यांमधील सावित्रीबाई या एकाच स्त्रीचे विविध रूप दाखवतात — शिक्षिका, समाजसेविका, विचारवंत, कवी, क्रांतिकारक आणि माता.

**९. व्यक्तिरेखेचे सर्जनशील वैशिष्ट्य**

या चरित्रात्मक कादंबऱ्यांतील व्यक्तिरेखा वास्तववार आधारलेली असली तरी त्यात कादंबरीकारांचा कल्पकतेचा स्पर्श जाणवतो . सावित्रीबाईंच्या संवादांतून कादंबरीकारांनी त्यांचा धीर, आत्मविश्वास आणि मानवी दृष्टिकोन प्रकट केला आहे. त्यांच्या प्रत्येक कृतीमागे एक मूल्यप्रणीत विचार असतो — शिक्षण, समानता, स्वाभिमान, आणि सेवा. त्यामुळे ही व्यक्तिरेखा साहित्यिक दृष्ट्या "प्रेरणादायी नायिका" म्हणून साकारली आहे.

**१०. सावित्रीबाईंच्या व्यक्तिरेखेचे आजच्या काळातील महत्त्व**

आजच्या स्त्रीवादी चळवळींना, शिक्षणप्रणालींना आणि सामाजिक न्यायाच्या विचारांना सावित्रीबाईंची व्यक्तिरेखा अजूनही प्रेरणा देते. त्यांचे विचार आजच्या काळातील असमानता, अन्याय आणि दमन याविरुद्धच्या संघर्षाला दिशादर्शक आहेत. त्यांची चरित्रात्मक प्रतिमा केवळ ऐतिहासिक नव्हे, तर आधुनिक स्त्रीचे आदर्शरूप घेऊन कादंबरीकरांनी साकारलेली आहे.

**निष्कर्ष:**

सावित्रीबाई फुले यांच्या चरित्रात्मक कादंबऱ्यांतून साकारलेली व्यक्तिरेखा ही संघर्षशील, विचारवंत, करुणामयी, मातृत्वपूर्ण आणि मानवतावादी स्त्रीचे एकत्रित दर्शन घडवते. त्यांचे जीवन आणि कार्य हे भारतीय स्त्रीच्या मुक्तीचे केंद्रबिंदू ठरले आहे. विविध कादंबरीकारांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलू उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. तरी सर्व कादंबऱ्यांतून उभे राहणारे सावित्रीबाईंचे व्यक्तिमत्वाचे चित्रण म्हणजे पुढील प्रमाणे दिसून येते.

"**आत्मविश्वास, शिक्षण प्रसारक, आणि मानवी सेवाभाव यांचे साक्षात प्रतीक**".

त्यामुळे सावित्रीबाईंची व्यक्तिरेखा केवळ इतिहासातील नव्हे, तर समाजाला सतत मार्गदर्शन करणारी जीवंत कार्यशक्ती म्हणून आजही स्मरणात राहते.

**समारोप :**

सावित्रीबाई फुले विषयक लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्यांनी एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध व विसाव्या शतकाचा काही भाग एवढा कालखंड व्यापलेला दिसून येतो. या कादंबऱ्यामूधन सावित्रीबाईंच्या जीवनकार्याबरोबरच या कालखंडाचे यथार्थ दर्शनही कलावंतांनी घडविले आहे. त्याकाळातील सामाजिक, धार्मिक, राजकीय परिस्थितीचे दर्शनही यातून वडते. परंतु या कलावंतांना सावित्रीबाईंचे लोकविलक्षण कार्य, त्यांच्या जीवनातील चढउतार, त्यांचे जीवन, मानवी पातळीवरून व्यक्त करतानाही मर्यादाच आलेल्या दिसून येतात. याकरिता सावित्रीबाई फुले यांच्याविषयी लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्यांची निर्मिती प्रेरणा जाणून घ्यावी लागते. सावित्रीबाईंची फार काळ उपेक्षा आपल्या समाजात झाली. परंतु आज त्यांच्या विचारांची, कार्यप्रणालीची समाजाला गरज आहे. त्यांचे कार्य शतकानंतर का होईना आज समाजापुढे यावे, त्यातून सर्वांनी प्रेरणा घ्यावी या अपेक्षेनेच प्रस्तुत कादंबऱ्यांचे लेखन झालेले दिसून येते.

**संदर्भसूची:**

१) कांबळे, झुंबरलाल. सावित्रीबाई फुले, सुगावा प्रकाशन पुणे , प्रथम आवृत्ती: १९९५.

२) बनसोडे, हि. गो. आभाळाएवढी. दादर मुंबई शलाका प्रकाशन प्रथम आवृत्ती:१९८१

३) पांढरे नीला, पॉपीलॉन प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती :२००१

४) मुरूमकर कविता, मी सावित्री जोतीराव अन्वी पब्लिकेशन, सोलापूर प्रथम आवृत्ती: २०१०

५) अनाथांची माय माऊली, हिराचंद्र ब्राह्मणे कल्पना बुक डीलर्स, पुणे प्रथम आवृत्ती :२०१६